छायाः तुषार देसाई

# ऑलराऊण्डर



**करिअर म्हणून खेळावर अधिक लक्ष दिल्यास अभ्यासाकडे दुर्लक्ष होते अशी पालकांची नेहमीची तक्रार असते. रुईया कॉलेजमध्ये शिकणाऱ्या अनुकूलने मात्र उत्तम अभ्यास करीत स्विमिंगमध्ये अनेक सुवर्णपदकं मिळवून दोहोंमध्ये सुवर्णमध्य साधला आहे.**

विनायक राणे
vinayak.rane@timesgroup.com

आजची तरुण पिढी आपल्या करिअरच्या बाबतीत खूप जागरुक असते. अनेक यंगस्टर्स स्पोर्ट्स किंवा अभ्यास या दोन ऑप्शन्सपैकी एकाची करिअरसाठी निवड करते. मुलुंडला राहणाऱ्या आणि रुईयाच्या अनुकूल शेणॉयने मात्र खेळ व अभ्यास या दोन्हीचा मिलाफ साधत खराखुरा 'ऑलराऊण्डर' बनण्याचं ध्येय समोर ठेवलंय. यंदाच्या इण्टरकॉलेज स्विमिंगमध्ये तब्बल १२ गोल्ड मेडल्स पटकावण्याचा पराक्रम या स्विमरने करून दाखवलाय. शिवाय अभ्यासावरही त्याचं तितकंच लक्ष आहे.

सध्या आपला बायोटेकचा अभ्यास सांभाळून तो कॉलेजातील बायोटेक फेस्टिव्हलच्या मॅनेजमेण्टमध्ये व्यस्त आहे. अभ्यासातही हा पठ्ठ्या एकदम हुशार. दहावीला मुंबई बोर्डातून पहिला येण्याचा मान त्याने पटकावला होता. 'मी खूप लकी आहे. इण्टरकॉलेज स्विमिंग स्पर्धा ऑगस्ट, सप्टेंबर दरम्यान आटपत असल्याने इतर महिने अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येतं', अनुकूल सहज सांगतो.

या मुलुंडकराने थेट इण्टरयुनिव्हर्सिटी स्पर्धांमध्येही ठसा उमटवला आहे. गेली दोन वर्षे तो या स्पर्धांमध्ये अनेक पदकं मिळवतोय. या कामगिरीची दखल घेत रुईयाने अनुकूलला 'क्रीडाभूषण' हा पुरस्कार देऊन गौरवलं. इण्टरकॉलेज स्विमिंग स्पर्धेत त्याने तीन रेकॉर्ड नोंदवलेत. वीस वर्षांच्या अनुकूलचा 'लाईफ फण्डा' एकदम 'क्लिअर' आहे. 'सध्या तरी अभ्यासाला प्राधान्य. पुढे आणखी शिकण्यासाठी परदेशातही जाईन. यातून वेळ मिळाला की मग स्विमिंग. पण स्विमिंग अर्थातच सोडणार नाही', असं अनुकूल म्हणतो.

स्विमिंगमधल्या करिअरसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा स्विमिंगपूल हवा, असं अनेकजण सांगतात. अनुकूल मात्र याला अपवाद आहे. तो एका सोसायटीच्या स्विमिंगपूलमध्ये सराव करतो. खरं तर अनुकूल एका प्रोफेशन पूलमध्ये सरावास जायचा, पण काही कोत्यावृत्तीच्या अधिकाऱ्यांमुळे त्याला तेथे सरावास मज्जाव करण्यात आला. 'आवड व निष्ठा असेल तर मग सराव कुठेही करता येईल', असं तो सांगतो.

### वारसा वडिलांचा

अनुकूलचे वडील तारानाथ शेणॉय हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम स्विमर. त्यामुळे स्विमिंगचं 'टॉनिक' त्याला घरातूनच मिळालं. वडीलच त्याच्या कोचची भूमिका पार पाडत आहेत. पद्मश्री, छत्रपती, अर्जुन असे मानाचे पुरस्कार लाभलेल्या तारानाथ यांची अनेक मेडल्स घरातील शोकेसमध्ये आहेत. ही मेडल्स पाहूनच अनुकूलला स्विमिंगमध्ये येण्याची प्रेरणा मिळाली. ऐकताना नवल वाटेल, पण अनुकूलने वयाच्या दुसऱ्या वर्षी प्रथमच स्पर्धात्मक स्विमिंगमध्ये भाग घेत रौप्यपदक पटकावलं होतं.

### झळाळतं यश

इण्टर कॉलेज २००९

**१३ सुवर्ण, २ सिल्व्हर, वॉटरपोलोमध्ये ब्राँझ**

इण्टर कॉलेज २०१०

**१२ सुवर्ण, २ सिल्व्हर, १ ब्राँझ**

### तुमची अचिव्हमेण्ट कळवा

कॅम्पसमध्ये असे अनेक चेहरे असतात ज्यांच्या नावावर बक्षीसांची मोठी यादी असते. एखाद्या कल्चरल कॉम्पिटिशनपासून ते शैक्षणिक परीक्षेपर्यंत विविध ठिकाणी कॉलेजियन्स विशेष यश मिळवत असतात. तुम्हालाही जर अशा कुणाच्या अचिव्हमेण्ट्स माहित असतील तर त्या आम्हाला जरूर कळवा. mumbaitimes@indiatimes.com किंवा फॅक्स - २२७३११७५, संपर्क : ६६३५४२३० (दु. २ ते ५)